MHYA100005152025

# न्यायनिर्णय

## (दिनांक : २२/०७/२०२६ रोजी घोषीत)

**१.** अभिलेखावर असलेल्या पुराव्यावरुन खालील मुद्दे माझ्या निर्णयार्थ उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दि. २२/१०/२०२४ रोजी ०४.१५ वाजेच्या सूमारास मौजे मोहदा, ता. केळापूर, जि. यवतमाळ येथे आरोपी त्याच्या ताब्यात १२ लिटर गावठी हातभट्टी दारु व ६०० लिटर मोहसडवा नाल्याजवळ बेकायदेशीररीत्या गाळत असतांना मिळून आला काय हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | : | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | : | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**२.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.१ दिनेश शेषराव दरवळकर (पंच) व साक्षीदार क्र. २ राजू गेडाम (पोलीस स्टाफ), साक्षीदार क्र. ३र राजु मुत्यलवार (पोलीस स्टाफ) तसेच साक्षीदार क्र. ४ इमरान खान (फिर्यादी तथा तपास अधिकारी) यांची साक्ष नोंदविलेली आहे. त्याशिवाय, घटनेची फिर्याद नि.क्र. १६ या कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहे.

३. अभियोग पक्षाच्या साक्षीचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द गुन्हासदृश्य तथ्य मिळून आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचा जबाब नोंदविण्यात आला. आरोपीतर्फे बचावा पृष्ठ्यर्थ कोणताही पुरावा सादर करण्यात आलेला नाही.

४. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे वकील यांचा युक्तीवाद श्रवण केला.

**<u>मुद्दा क्र.१ करीता :-</u>**

५. अभियोग पक्षाने केलेले आरोप सिध्द करण्यासाठी आद्य जबाबदारी अभियोग पक्षाची असते. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पुराव्यातुन आरोपीवर केलेले आरोप सिध्द करणे अभियोग पक्षाचे साद्य असते. आरोप सिध्द करणे म्हणजे त्या त्या गुन्ह्याचे आवश्यक घटक प्रस्थापित करणारे तथ्य पुराव्यातुन सिध्द करणे होय. अशा पुराव्याची सांगड घालताना अभियोग पक्षाला सर्वतोपरी काळजी घ्यावी लागते की, अशा पुराव्याच्या सादरीकरणातुन कोणताही वाजवी संशय निर्माण होणार नाही किंवा पुराव्यावर विश्वास ठेऊ नये अशी परिस्थिती उदभवणार नाही. पुराव्याचे निरीक्षण करताना हे लक्षात ठेवावे लागते की, जर निमार्ण होणारा संशय वाजवी असेल तर तो निश्चितच बचाव पक्षाला मदत करतो म्हणुन उपलब्ध पुराव्याचे बारकाईने परिनिरीक्षण होणे आवश्यक आहे.

६. आरोपी विरोधात आरोप केलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी या चौकशीत अभियोग पक्षाला हे प्रस्थापित करावयाचे होते की, आरोपी हा अवैद्यरित्या गावठी हातभट्टी दारु गाळतांना मिळून आला.

७. साक्षीदार क्र.१ दिनेश शेषराव दरवळकर (पंच), यांनी त्यांच्या साक्षीमध्ये अभियोग पक्षाच्या कथनास पृष्टी देणारे कथन केलेले नसुन त्यांनी त्यांच्या जबाबात पंचनाम्याबाबत कुठलेही महत्वाचे विधान केले नाही. सदरील पंच साक्षीदार हा त्यांच्या

पुर्वीच्या जबाबास मुखर झाल्याने त्यांना उलट तपासाप्रमाणे प्रश्न विचारण्याची परवानगी सरकारी अभियोक्ताद्वारे मागण्यात आली. परवानगी दिली असता सदरील साक्षीदारांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली आहेत.

८. साक्षीदार क्र.२ राजू गेडाम (साक्षीदार) यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक २२.१०.२०२४ रोजी ते कर्तव्यावर असतांना तपासी अधिकारी यांनी त्यांना फोनव्दारे कळविले की, मोहदा येथे एक इसम अवैद्यरित्या दारु गाळप करीत आहे. त्यावरुण ते घटनास्थळी छापा मारण्यासाठी त्यांच्यासोबत फिर्यादी ईमाम,राजु मुत्यलवार,प्रमोद जुनघरे व राजु रनमले व सोबत दोन पंच खात्री झाल्याने ०४.१५ वाजता आरोपीवर छापा टाकला. त्यावेळी आरोपी नाल्याच्या किना–यावर गावठी दारु गाळप करीता असतांना मिळूण आला. सदर ठिकाणी झडती घेतली असता १२ लिटर गरठी हाभट्टी दारु व ६०० लिटर मोहसडवा असा मुद्देमाल मिळून आला. जप्त मुद्देमालापैकी एक १८० एम एल ची शिशी रासायनिक विश्लेषनासाठी राखून वेगळा कढुण घेतला व सदर मुददेमला हेड मोहरर कडे जमा केला. हेड मोहरर यांनी दिल्याप्रमाणे त्यांनी सदर मुददेमाल रासायनिक परीक्षणाकरीता घेउण गेले.

९. परंतू रासायनिक परीक्षणाकरीता सहायक संचालक वैज्ञानिक प्रगोगशाळा यांना पाठविण्यात आलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता, सदर अर्जामध्ये मुद्देमाल वाहूण नेणा–याचे नाव नमुद नाही. जरी साक्षीदार क्र. २ राजू गेडाम यांनी मुददेमाल वाहुण अमरावती येथे परीक्षणाकरीता नेला असे कथन केले असले तरी त्यांचे नाव अर्जात नमुद नसल्यामुळे त्यांनी सदर मुददेमाल वाहुण नेला हे सिध्द होत नाही. तसेच त्यांनी मुद्देमाल कोणत्या तारखेला वाहुण नेला हे देखील नमुद नसल्यामुळे जप्त मुददेमाल रासायनिक परीक्षणाकरीता पाठविण्यात आला या बाबीवर शंका निर्माण होत आहे. तसेच साक्षीदाराच्या म्हण्यानूसार दोन सॅम्पल रासायनिक परीक्षणाकरीता वेगळे काढण्यात आले. परंतू सदर अर्जामध्ये सॅम्पलची संख्या एक अशी नमुद केल्यामुळे त्यांनी सॅम्पल रासायनिक परीक्षणाकरीता पाठविले ही बाब सिध्द होत नाही.

**१०.** साक्षीदार क्र.३ राजू मुत्यलवार (साक्षीदार) यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक २२.१०.२०२४ रोजी ते कर्तव्यावर असतांना तपासी अधिकारी यांनी त्यांना फोनव्दारे कळविले की, मोहदा येथे एक इसम अवैद्यरित्या दारु भट्टी चालवित आहे. त्यावरुण ते घटनास्थळी छापा मारण्यासाठी त्यांच्यासोबत फिर्यादी ईमाम, लक्ष्मी मलकुवार, प्रमोद जूनदकर व राजु रनमले असे आरोपीवर छापा टाकला. त्यावेळी आरोपी नाल्याच्या किना–यावर गावठी दारु काढत असतांना मिळूण आला. सदर ठिकाणी झडती घेतली असता १२ लिटर गरठी हाभटटी दारु व ६०० लिटर मोहसडवा असा मुद्देमाल मिळून आला. जप्त मुद्देमालापैकी एक १८० एमएलची शिशी रासायनिक विश्लेषनासाठी राखून ठेवली. आरोपीस आज न्यायालय कक्षात हजर आहे. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर कार्यवाही करण्याकरीत केवळ पोलीस कर्मचारी असल्याचे कथन केले आहे. त्यांच्या पुराव्यामध्ये त्यांना कुठेही त्यांच्या सोबत घटनास्थळ पंच होते याचा उल्लेख केला नाही. त्यामुळे घटनास्थळी पंच होते हि बाब संधिग्ध आहे. फिर्यादी यांनी घटनास्थळ पंचांच्या समक्ष पंचनामा करुण आरोपीच्या ताब्यातुन दारु जप्त केली हि बाब सदर साक्षीदाराच्या पूराव्याच्या माध्यमातुन सिध्द होत नाही. तसेच घटनास्थळ पंच साक्षीदार यांनी सुध्दा आरोपी विरुध्द काहीही सांगीतले नसल्यामुळे पंचनामा त्यांच्या समक्ष झाला हि बाब सिध्द होत नाही.

**११.** साक्षीदार क्र.४ ईमराण दिवाण खान (फिर्यादी तथा तपासी अधिकारी) यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, दिनांक २२.१०.२०२४ रोजी ते मोहदा बिट येथे जमादार म्हणूण कार्यरत हाते. कर्तव्यावर असतांना त्यांना फोनव्दारे माहीती मिळाली की, मोहदा येथे एक इसम अवैद्यरित्या दारु विक्री करण्याच्या उददेशाने भट्टी चालवित आहे. त्यावरुण ते घटनास्थळी छापा मारण्यासाठी त्यांच्यासोबत स.पो.नि. लक्ष्मी मलकुवार, प्रमोद जूनदकर व राजु रनमले असे मोहदा येथे जाउण स्थानिक पंचांना सुचनापत्र नि.क्र. १३ दिले व पंचांना सोबत घेउण आरोपीवर छापा टाकला. त्यावेळी आरोपी नाल्याच्या किना–यावर गावठी दारु काढत असतांना मिळूण आला. सदर मुददेमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करुण जप्ती

पंचनाम करण्यात आता. सदर पंचनामा नि.क्र. १४ वर दाखल आहे. जप्त मुद्देमालापैकी एक १८० एमएलची शिशी रासायनिक विश्लेषनासाठी राखून ठेवली त्यावर त्यांच्या व पंचांच्या सहीचे लेबल लावले. घटनेची फिर्याद त्याने दाखल केली. त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास नि.क्र. १५ देण्यात आला. त्यानंतर प्रथम खबरी अहवाल तयार करण्यात आला. त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास नि.क्र. १६ देण्यात आली. त्यानंतर जप्त मुददेमला हेड मोहरर कडे जमा करुण त्याची मुददेमाल पावती तयार करण्यात आली. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास नि.क्र. १७ देण्यात येते. त्यांनतर सदर मुददेमला पो.हे.कॉ. राजू गेडाम यांचे मार्फत सी.ए. परीक्षणाकरीता पाठविण्यात आला त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास नि.क्र. १८ देण्यात येते.

**१२.** सदर साक्षीदार यांच्या पूराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी आरोपीच्या ताब्यातुन कोणत्या प्रकरचा मुद्देमाल जप्त केला व तो किती प्रमाणात होता, याबद्दल त्यांनी कुठेही वर्णन केले नाही. तसेच त्यांनी १८० एम.एल. मुद्देमाल रासायनिक परीक्षणाकरीता पो.हे.कॉ. राजू गेडाम यांचे मार्फत पाठविला असे नमूद केल्याचे दिसून येते. परंतू सि.ए.परीक्षणाकरीता पाठविण्यात आलेल्या अर्जामध्ये वाहुण नेणा–याचे नाव दिसून येत नाही. तसेच मुद्देमाल कोणत्या तारखेला सि.ए.करीता पाठविण्यात आला ही बाब देखील सदर अर्जामध्ये नमुद नाही. त्यामूळे पो.हे. कॉ. राजू गेडाम यांनीच सदर मुद्देमाल सि.ए.परीक्षणाकरीता वाहुण नेला हि बाब सिध्द होत नाही. तसेच त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे कथन केले आहे की, सदर प्रकरणातील पंचांना त्यांनी कमीत कमी २५ प्रकरणात पंच म्हणूण बोलाविले आहे. तसेच त्यांना मोहदा बिट मध्ये काम करण्याचा वरीष्ठांकडुण आदेश असल्याचा कोणताही पुरावा त्यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच त्यांनी नि.क्र. १४ मध्ये खोडतोड कश्यामुळे करण्यात आली याबाददल देखील कुठलेहा खूलासा दिलेला नाही. तसेच सॅम्पल काढण्याकरीता वापरलेल्या शिष्या पंचांसमक्ष स्वच्छ केल्या नाही ही बाब देखील त्यांनी मान्य केली आहे. वरील सर्व बाबींचा विचार केला असता असे दिसून येते की, सदर पंचनामा पंचांसमक्ष करण्यात आला नसूण जप्त करण्यात

आलेला मुद्देमाल ही दारुच होती हे सिध्द होत नाही.

**१३.** अभियोग पक्षाच्या खटल्यानुसार आरोपीच्या ताब्यातुन गावठी दारु व मोहमाच सडवा जप्त केला आहेत. सदर बाब फिर्यादी यांनी कथन केली असली तरी सदरील वरील नमुद रसायन ज्या स्वतंत्र पंच साक्षीदारांसमोर जप्त करुन पंचनामा तयार करण्यात आला आहे, त्यातील पंच साक्षीदार याने अभियोग पक्षास पुरक कथन केलेले नाही त्यामुळे परिपोषक पुराव्या अभावी पंचनामा पुर्णपणे शाबीत झाला असे निष्कर्ष काढणे विधीग्राह्य होणार नाही. त्यामुळे, जप्त केलेला मुद्देमाल हा आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केला आहे किंवा कसे त्याचप्रमाणे आरोपीचा व मुद्देमालाचा संबंध असल्याची बाब अभियोग पक्ष शाबीत करण्यास असमर्थ ठरले आहे. त्याचप्रमाणे, अशी जप्ती झाली होती असे गृहीत धरले तरी ती मोहोरबंद बाटली रासायनिक विश्लेषणासाठी कोणमार्फत पाठविली ही बाब सिध्द झाली नाही.

**१४.** त्याचप्रमाणे अभिकथित जप्त माल हा मादक द्रव्य होते हे दर्शविण्यासाठी रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखी सादर केलेला आहे. सदर अहवालाचे वाचन करता रासायनिक विश्लेषकांनी तपासलेल्या नमुन्यात होकारार्थी इथिल अल्कोहोल असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे तपासलेला नमुना हा दारु तयार करण्यासाठी वापर केला जाऊ शकतो असे मत देखील रासायनिक विश्लेषकांनी मांडले आहे. परंतु या ठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, तपासलेला नमुना निश्चित ह्याच खटल्याशी निगडीत होता हे दर्शविण्यासाठी आवश्यक असलेला नमुना वाहक कोण होता ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केलेली नाही. त्याचप्रमाणे जप्ती पंच याने अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष दिलेली नाही. त्यामुळे, जप्ती पंचनामा संशयापलीकडे जाऊन शाबीत झालेला नसल्याने सदरील दारु व इतर साधने आरोपीच्याच ताब्यातून जप्त केलेले आहे हे देखील अभियोग पक्ष शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे पुराव्यांची साखळी सादर करताना अभियोग पक्षाला अपयश आले आहे हे स्पष्ट होते.

**१५.** या उपरोक्त दप्तरी आलेला पुरावा जरी जशास तसा ग्राह्य मानला तरी त्यांचा

पुरावा आरोपीस गुन्ह्याशी जोडण्यास पुरेसा नाही. आरोपीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केला नाही, सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केले असता जप्त मुद्देमालापैकी १८० मिली ही एक बाटली रासायनिक विश्लेषणासाठी पाठवली होती, सदर रासयनिक परीक्षणाचा अहवाल सुध्दा प्रकणात दाखल असल्याचे दिसून येत परंतु सदर मुददेमला कुणामार्फत पाठविण्यात आला. मुददेमाल परीक्षणाकरीता वेगळा काढत असतांना शिष्या पंचांसमक्ष स्वच्छ न केल्यामुळे सदर शिशी मध्ये पुर्वीच दारु होती किंवा आरोपीच्या ताब्यात कथित गावठी दारु मिळून आली याबाबतचा कोणताही पुरावा अभियोग पक्ष देण्यास असमर्थ ठरले आहे. त्याचप्रमाणे तपासी अधिकारी यांनी जरी जप्ती पंचनामा शाबीत केलेला असेल परंतु अभियोग पक्षाने सदरील पंचनाम्यावरील तपासलेले पंच यांनी अभियोग पक्षास पुरक असे विधान न केल्याने सदरील जप्ती पंचनामा पुर्णपणे शाबीत झाल्याचे निष्कर्ष काढणे विधीग्राह्या होणार नसल्याने सदरील गावठी दारु आरोपीच्याच ताब्यातून जप्त केलेले आहे हे देखील अभियोग पक्ष शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळ पुराव्यांची साखळी सादर करताना अभियोग पक्षाला अपयश आले आहे हे स्पष्ट होते.

**१६.** वरील सर्व बाबींचा विचार करता हे स्पष्ट होते की, दारु बंदी अधिनियमाच्या संबंधित कलमानुसार दंडनीय गुन्हा या आरोपीने केले हे प्रस्थापित करण्यास अभियोग पक्षाला अपयश आलेले आहे. म्हणजेच यापुर्वी उल्लेख केल्याप्रमाणे आवश्यक घटक सिध्द करण्यात किंवा त्याचे अस्तित्व प्रस्थापित करण्यात अभियोग पक्षाला पुर्णतः अपयश आले आहे हे स्पष्ट होते. त्यामुळे, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता :-</u>**

१७. मुद्दा क्र.१ च्या नकारार्थी निष्कर्षाअंती मी मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षा दाखल पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| आदेश | |
|---|---|
| १) | आरोपी नामे – **देवराव नामदेव जाधव** यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) नुसार मुंबई (महाराष्ट्र) दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(क)(ड)(ई)(फ) प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २) | आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३) | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे. सदर बंधपत्र पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहतील. |
| ४) | मुद्देमाल जागीच नाश करण्यात आल्यामुळे त्याबाबत आदेश नाही. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित) | |

**स्वा/–**
**(सायमा एन.ए.एस.शेख )**
दिनांक :२२/०७/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट क्र.३,
केळापूर.